सकाळ

रविवार,
९ ऑक्टोबर २०२२

# दोडामार्गमध्ये मैदानी प्रशिक्षण

**दोडामार्ग, ता. ८ :** यशस्वी होण्यासाठी आवडत्या गोष्टींचा त्याग करा, असे आवाहन पोलिस कवायत प्रशिक्षक कृष्णा जंगले यांनी केले. येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रमांतर्गत पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रात एकदिवसीय मैदानी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली होती. या वेळी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व सिंधुदुर्ग जिल्हा पोलिस दलातील कवायत प्रशिक्षक (ड्रिल इन्स्ट्रक्टर) जंगले बोलत होते.

जंगले यांनी या वेळी विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेबाबत मार्गदर्शन तसेच मैदानी सराव करून घेतला. १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.



दोडामार्ग : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कृष्णा जंगले आदी.

'अग्निवीर' व इतर तत्सम भरतीसाठी मैदानी प्रशिक्षणात रनिंग, गोळाफेक, शारीरिक तंदुरुस्ती, आहार तसेच अभ्यासाबाबत मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी व्यायामाचे महत्त्व सांगितले. करियर कट्टातर्फे घेतलेल्या यूपीएससी फाउंडेशन कोर्सच्या सीईटी परीक्षेत उत्तीर्ण १६ विद्यार्थ्यांचा सत्कार केला. प्रीतिका साळकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. एन. खडपकर यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. सावंत, करियर कट्टा समन्वयक डॉ. एस. एस. पाडगावकर, डॉ. एस. एन. जाधव उपस्थित होते.



दोडामार्ग : साहित्य वाटप करताना सुभेदार मेजर दिनेश गेडाम. शेजारी डॉ. सावंत, सुभेदार खैरनार, डॉ. पाडगावकर आदी.

## दोडामार्गमध्ये 'एनसीसी'ला साहित्य

**दोडामार्ग :** येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात ५८ महाराष्ट्र बटालियनतर्फे महाविद्यालयातील प्रथम वर्षात 'एनसीसी'मध्ये प्रवेश घेतलेल्या एकूण ३६ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून युनिफॉर्मसाठी लागणारे कापड वाटप करण्यात आले. या वेळी सुभेदार मेजर दिनेश गेडाम यांनी विद्यार्थ्यांना 'एनसीसी'मधून करिअरच्या संधी, विविध शिष्यवृत्ती तसेच एनसीसीचे महत्त्व सांगितले. एनसीसीमधून राष्ट्रीय पातळीवर असलेल्या शिष्यवृत्ती तसेच विविध कँम्प व त्याचे फायदे याबद्दल माहिती दिली. या प्रसंगी एनसीसी युनिफॉर्मचे कापड तसेच इतर साहित्य वाटप करण्यात आले. सुभेदार टी. एफ. खैरनार, हवालदार जगदीश भाई, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व एनसीसी प्रमुख सी.टी.ओ. डॉ. एस. एस. पाडगावकर उपस्थित होते.